# मांडणी



डॉ. ममता इंगोले
प्रमुख मराठी विभाग
डॉ. एच.एन.सिन्हा कला व वाणिज्य म
महाविद्यालय पातुर, जिल्हा. अकोला
.

बी.कॉम.भाग -3 (मराठी आवश्यक)

# कविता : माझी कविता

कवी : नागराज मंजुळे

- परिचय : नागराज बाबूराव मंजुळे
- (जन्म: १९७४)
- मूळचे जेऊर (ता. करमाळा, जि. सोलापूर) या गावचे.
- प्रख्यात कवी, लेखक, चित्रपटदिग्दर्शक, निर्माता, संवादलेखक आणि अभिनेते.
- 'पिस्तुल्या' आणि 'पावसाचा निबंध' हे त्यांचे गाजलेले लघुपट होत.
- 'फॅण्ड्री' आणि 'सैराट' हे त्यांचे चित्रपट मराठी चित्रपटसृष्टीतील मैलाचे दगड म्हणून ओळखले जातात.
- त्यांच्या सर्वच चित्रपटांना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत.
- राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त 'नाळ' या चित्रपटाची निर्मिती आणि लेखन त्यांनी केले आहे.

- आगामी 'झुंड' या हिंदी चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारीही त्यांनी सांभाळली आहे.
- अभिनयाची कुठलीही पार्श्वभूमी नसलेल्यांना चित्रपटात घेऊन त्यांना राष्ट्रीय पुरस्कार आणि नावलौकिक मिळवून देणारा दिग्दर्शक, अशीही त्यांची खास ओळख आहे.
- 'माझी कविता' ही कविता त्यांच्या 'उन्हाच्या कटाविरुद्ध' या कवितासंग्रहातील आहे.
- 'उन्हाच्या कटाविरुद्ध' या काव्यसंग्रहाला भैरूरतन दमाणी साहित्य पुरस्कार, नारायण सुर्वे काव्यप्रतिभा पुरस्कार, दया पवार स्मृती पुरस्कार इ. अनेक नावाजलेले पुरस्कार मिळालेले आहेत.
- प्रस्तुत कविता ही राबणाऱ्या, उपेक्षित, हीन आणि अन्यायाने पिचलेल्या माणसांच्या बाजूने ठामपणे उभी राहत थेटपणाने जाब विचारते, त्याचप्रमाणे माणसाला माणूसपण बहाल करण्यासाठी झटत राहते.

माझी कविता

फाटकी चोळी

ठिगळांच्या पदरानं दडवत

रणरणतं ऊन

खुरपणारी

बाभळीला झोके

घेत घेत

उपाशीपोटी झोपी गेलेली

माझी मलूल कविता

रोज एक स्वप्न

शिव्या भाकरीसोबत तोंडी लावून

सुतकीचे घाव

दगडावर मारताना धपापणारी

माझी आशाळभूत कविता

'बा'ची वाट पाहून

रात्र पडते पोटात पाय घेऊन

पोरांसहित तेव्हा

'भुकेजल्या चुलीसाठी काटे तोडताना

तळहातात मोडलेला काटा उपसून

मुक्यानंच टिपं गाळणारी

अश्राप माझी... सोशीक कविता

# धन्यवाद